दैनिक

लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ८४ वा ▶ सोमवार दि.२९ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...

खास लोकांच्या आग्रहास्तव

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे

पार्सल सेवा व रिटर्न बुकिंग उपलब्ध

धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला

स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस

रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

न्यूज कॉलम

देवपुरात घरफोडी; ४८ हजारांची चोरी

धुळे । देवपुरातील संत गाडगेबाबा कॉलनीत घरफोडी करीत चोरट्यांनी सोने-चांदीचे दागिने आणि तांबे- पितळाच्या वस्तू असा ४८ हजारांचा मुद्देमाल लंपास केला. यशवंत शंकरराव गागरे यांच्या तक्रारीनुसार ५ ते २३ जानेवारीदरम्यान चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून प्रवेश केला. घरातील नऊ हजारांची सोन्याची अंगठी, सात हजारांची सोन्याची अंगठी, २० हजार रोख, पाच हजारांचे तांब्याचे भांडे, देवता, घागर हंडा, तांबे, गंगाळ, दिवा, तीन हजारांचे गणेशमूर्ती, लक्ष्मी दिवा, कुंकवाचा करंडा, चार हजारांचे पितळी भांडे असा ४८ हजारांचा ऐवज लंपास केला.

घोटीतील 'त्या' खुनाचा १२ तासांत उलगडा

नाशिक । शहरातील पचितराय बाबा नगरासमोर दोन दिवसांपूर्वी दगडाने ठेचून झालेल्या एका तरुणाच्या खूनाचा घोटी पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईमुळे अवघ्या बारा तासांत छडा लागला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपीसह इतर संशयित आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. शहरापासून हाकेच्या अंतरावर रेल्वे लाईनच्या बाजूला युवकाचा मृतदेह सापडला होता. मुकणे येथील रूपेश संतू साबळे हे सहा महिन्यांपासून घोटीत राहण्यासाठी आले होते. त्यांची पत्नी सविता शहरातील एका खासगी रुग्णालयात कामाला होती.

आंदोलन सुरुच ठेवणार

विरोधकांच्या टीकेनंतर मनोज जरांगेंची घोषणा

जालना । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जोपर्यंत या अध्यादेशाचा कायदा होऊन एकाला तरी त्या कायद्याअंतर्गत मराठा आरक्षणाचा फायदा होत नाही, तोपर्यंत हे आंदोलन असेच सुरु राहणार असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले. त्यामुळे या कायद्याअंतर्गत एकाही मराठ्याला आरक्षण मिळाले की आंदोलनाचे काय करायचे हे ठरवू. या आंदोलनाबाबत आपल्याला गाफील राहता येणार नाही. ज्यांच्या नोंदी नाहीत त्यांना या कायद्याचा लाभ झाला पाहिजे. नोंद मिळालेल्या सग्या सोयऱ्यांना सरकार काढलेल्या अधिसूचनेच्या आधारे एक तरी प्रमाणपत्र मिळे पर्यत हे आंदोलन सुरूच राहणार, असे मनोज जरांगे यांनी म्हटले.

सगेसोयऱ्यांनाही आरक्षण देण्याबाबतचा अध्यादेश सरकारकडून काढण्यात आल्यानंतर मनोज जरांगे पाटील काल रात्री उशिरा अंतरवाली सराटीत आले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवालीत मराठी समाजाची आज सभा घेऊन मोठा निर्णय घेतला आहे. आपल्या बाजूने कायदा झाला असला तरी आपलं हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचं मनोज जरांगे यांनी यावेळी सांगितलं आहे. कायदा पास झाला तो नुसता कायदा राहू नये. सगेसोयऱ्यांचा कायदा पास झाला पण फायदाच नाही झाला तर काय फायदा असं मनोज जरांगे यांनी पुढे म्हटलं आहे.



खरा गुलाल त्यावेळी उधळू : जरांगे

खरा गुलाल हा कायद्याची अंमलबजावणी झाल्यावर एकाला तरी त्या कायद्याअंतर्गत प्रमाणपत्र मिळाल्यावर उधळू. त्यावेळी विजयी कार्यक्रम करु. कारण सगेसोयऱ्यांची अधिसूचना निघणे खूप महत्वाचे होते, असे राजपत्र क्वचितच निघते. याच कायद्यात रूपांतर होणार आहे. ते होईपर्यंत आपण सावध राहायचे असते, असे मनोज जरांगेंनी म्हटले आहे.

तरच विजयी कार्यक्रम घेऊ

मनोज जरांगे म्हणाले की, पहिले प्रमाणपत्र मिळाल्यावर विजयी कार्यक्रम घेऊ. तोपर्यंत कोणताही विजयी कार्यक्रम घ्यायचा नाही. जो कार्यक्रम घ्यायचा त्यातून फायदा झाला पाहिजे. मुंबईला गेलो कायदा झाला. राज्यभर फिरलो ५४ लाख नोंदी मिळाल्या. केवळ मोचें काढून ताकद दाखवून ओळख मिळवण्यात मला रस नाही. कोणताही कार्यक्रम घेतल्यावर समाजाचा फायदा झाला पाहिजे यावरच माझा भर आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नुसता कायदा राहू नये

मनोज जरांगे म्हणाले की, सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतचा सरकारने काल अध्यादेश काढला. ज्याची कुणबी म्हणून नोंद मिळाली आहे, त्याच्या नोंदीच्या आधारावर नोंद नसलेल्या सोयऱ्याला त्या कागदपत्राच्या अंतर्गत एक तरी प्रमाणपत्र मिळायला हवे. हे प्रमाणपत्र मिळत नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरू ठेवावे असे मला वाटते. कायदा पास झाला तो नुसता कायदा राहू नये. सगेसोयऱ्यांचा कायदा पास झाला पण फायदाच नाही झाला तर फायदा काय? असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

युपीचा अक्षय कुमार विजेता

नाशिक मविप्र मॅरेथॉन २०२४ स्पर्धेत मारली बाजी

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतर्फे काल रविवारी दि.२८ रोजी आयोजित केलेल्या ८ व्या राष्ट्रीय व १३ व्या राज्यस्तरीय नाशिक मविप्र मॅरेथॉन २०२४ स्पर्धेचे विजेतेपद उत्तर प्रदेशच्या अक्षय कुमार याने पटकावले. अक्षयने २ तास २६ मिनिटे १ सेकंद वेळेत स्पर्धा पूर्ण केली. कडाक्याच्या थंडीत पहाटे पावणे सहापासून स्पर्धेला सुरवात झाली. कडाक्याच्या थंडीतही धावपटूंचा उत्साह कायम होता. १४ गटात झालेल्या या स्पर्धेत चिमुकल्यांपासून ज्येष्ठ धावपटूंनी सहभाग नोंदविला. ४२ किलोमीटर पूर्ण मॅरेथॉनने स्पर्धेची सुरवात झाली. भारतीय हॉकी संघाचे नेतृत्व केलेले आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू मीर रंजन नेगी, मॅरेथॉन स्पर्धेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष व मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे, केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ.भारती पवार, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, संचालक डॉ. सयाजीराव गायकवाड, लक्ष्मण लांडगे, रमेश पिंगळे, आर. के. बच्छाव,संदीप गुळवे, शिवाजी गडाख, प्रविण जाधव, विजेंद्रसिंग, सेवक संचालक डॉ. एस. के. शिंदे, जगन्नाथ निंबाळकर यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवत स्पर्धेला सुरवात करण्यात आली.

पूर्ण मॅरेथॉनमध्ये धावतांना अक्षय कुमार याने २ तास २६ मिनिटे १ सेकंद अशी वेळ नोंदवत अव्वल क्रमांकासह मॅरेथॉनचे एक लाख रूपयांचे पारितोषिक पटकावले. स्पर्धेसाठी भारतातून उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा, मेघालय तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील धावपटू असे एकूण ३००० च्या वर स्पर्धक सहभागी झाले होते. बक्षिस वितरण समारंभ रावसाहेब थोरात सभागृहात संपन्न झाला.

ओझरला कारची रिक्षाला धडक; १ जण ठार २ जखमी

ओझर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येथील मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या दहावा मैल येथे भरधाव वेगात असलेल्या वॅगनर कारने समोर जाणाऱ्या रिक्षाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले.

विजय कुमार सुरेश बोरसे राहाणार भुसावळ हे पत्नी व आई समवेत रिक्षाने (एम एच १५ झेड ९७४९) ओझरकडून नाशिककडे जात असताना. त्याच सुमारास ओझर बाजूकडून नाशिककडे भरधाव वेगाने जाणाऱ्या वॅगनर कारने (एम एच १५ एच वाय ११५४) महामार्गावरील दहावा मैल येथील भाऊ हॉटेल समोर जबरदस्त धडक दिल्यामुळे रिक्षा पलटी होऊन झालेल्या अपघातात रिक्षामधील विजय बोरसे यांच्या डोक्यास गंभीर मार लागल्याने जागीच ठार झाले. तर चंद्रकला सुरेश बोरसे व रिक्षाचालक रामराव चौधरी हे गंभीर जखमी झाले असुन त्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पत्ता विचारण्याच्या बहाण्याने सोन्याची पोत खेचली

धुळे । इंदिरानगर परिसरामध्ये रविवारीजया वसंत काटे या रविवारी मॉर्निंग वॉकसाठी निघाल्या होत्या. पायी जात असताना, पत्ता विचारण्याच्या बहाण्याने त्यांना थांबविले. पत्ता विचारण्यात गुंतवून ठेवत कारमधील संशयिताने संधी साधत ७५ हजारांची सोन्याची पोत बळजबरीने खेचून कारमधून नाशिकरोडच्या दिशेने पोबारा केला.

सरकारकडून हट्ट पुरवण्याचे काम सुरू: छगन भुजबळ

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

सरकारकडून हट्ट पुरवण्याचे काम सुरु आहे. पण, ओबीसींमध्ये आरक्षण संपल्याची भावना आहे. त्यात तथ्य आहे. ओबीसी समाजही मतदान करतो हे सरकार विसरले आहे असा टोला शिंदे सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी लगावला आहे.

दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, भविष्यात दलित, आदिवासींमध्येसुद्धा कोणीही घुसतील असे करता येते का? मला दलित- आदिवासी समाजाच्या नेत्यांना विचारायचे आहे. याचे पुढे काय होणार? सर्टिफिकेट घेऊन आदिवासी होण्याचा प्रकार सोडविताना सरकारच्या नाकी नऊ येत आहे. हा ओबीसींवर अन्याय आहे की, मराठ्यांना फसवले जात आहे? असा सवाल भुजबळ यांनी उपस्थित केला आहे. छगन भुजबळ म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी काल घेतलेल्या निर्णयामुळे ओबीसी समाजात घबराट निर्माण झाली आहे. आमचे आरक्षण संपले आता पुढे काय करायचे असा प्रश्न सर्वांना पडला आहे. शिक्षणासह नोकरभरतीत आपल्याला संधी मिळणार नाही, तिथे मराठे वाटेकरी असणार आहेत. ओबीसी आरक्षण संपल्यासारखी स्थिती आहे अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. ही भावना मला चुकीची वाटत नाही.



कायमस्वरूपी टिकणारे आरक्षण सरकारच्या माध्यमातून दिले जाईल : दादा भुसे

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

कष्ट करणारे अनेक मराठा समाजाचे कुटुंब आहेत. त्यांची परिस्थिती खालावली आहे. इतर कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या गोरगरिबांना आरक्षण मिळाले पाहिजे, ही मागणी होती. त्या मागणीवर शिक्कामोर्तब झाला आहे. कुणबी नोंद असेल तो कायद्याच्या चौकटीत ओबीसीत बसेल, अशी प्रतिक्रिया पालकमंत्री दादा भुसे यांनी दिली आहे.

येणाऱ्या काळात सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून सर्व निर्णयांवर शिक्कामोर्तब करत कायमस्वरूपी टिकणारे आरक्षण राज्य सरकारच्या माध्यमातून दिले जाईल, असेही भुसे यांनी सांगितले. पालकमंत्री दादा भुसे यांनी शासकीय विश्रामगृहावर पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी भुसे बोलत होते. भुसे म्हणाले, की २३ जानेवारी हा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस, तर २७ जानेवारी हा धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांचा जन्मदिवस आहे. हे दोन्ही दिवस शिवसैनिक उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करतात. आज नाशिकमध्ये धर्मवीर आनंद दिघे यांचे पूजन करून हा दिवस साजरा केला जात आहे. या दिवसाचे औचित्य साधून गेल्या अनेक दिवसांपासून जरांगे-पाटील यांचा मराठा आरक्षणाचा लढा सुरू होता. त्याची यशस्वी सांगता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झाली आहे. कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या गोरगरिबांना आरक्षण मिळाले पाहिजे, ही मागणी होती. त्या मागणीवर शिक्कामोर्तब झाला असल्याचे त्यांनी सांगितले. या दिवसाचे औचित्य साधून गेल्या अनेक दिवसांपासून जरांगे-पाटील यांचा मराठा आरक्षणाचा लढा सुरू होता.कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या गोरगरिबांना आरक्षण मिळाले पाहिजे, ही मागणी होती. त्या मागणीवर शिक्कामोर्तब झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

जुन्या नोंदी असलेल्या मराठ्यांनाच आरक्षण : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा आरक्षणाबाबत जो निर्णय घेण्यात आला, तो केवळ पारंपारिक मराठा आरक्षणावर घेण्यात आला आहे. ज्या मराठा समाज बांधवांकडे जुन्या कुणबी नोंदी आहेत. परंतु त्यांना आरक्षण मिळण्यासाठी अडथळा निर्माण होत होता. त्यासाठी आम्ही ही आरक्षणाची प्रक्रिया सोपी करण्याचा विचार केला आहे. यामुळे कोणत्याही आरक्षणाला कुठलाही धक्का लागणार नसल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, अधिसूचनेत सर्व बाबी स्पष्टपणे नमूद करण्यात आलेल्या आहेत. ही अधिसूचना इतर समाजालाही मार्गदर्शक ठरणार आहे. छगन भुजबळ आमचे सहकारी असून त्यांनी अधिसूचनेची माहिती घेतल्यानंतर त्यांचाही गैरसमज दूर होईल, असा दावा शिंदेंनी केला आहे. आरक्षण देत असताना इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता कायद्याच्या चौकटीत टिकणारं आरक्षण देण्यात येणार असल्याचंही ते म्हणाले. मराठा समाजातील सगेसोयऱ्यांना आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी राज्य सरकारने नोटिफिकेशन काढलं आहे.

शिंदखेड्यात अखेर नवीन भाजीपाला मार्केट सुरू

शिंदखेडा । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येथील छत्रपती शिवाजी चौकात नव्याने बांधण्यात आलेले भाजीपाला मार्केट विक्रेत्यांसाठी खुले करण्यात आले. विक्रेत्यांनी तेथे आपली दुकाने थाटली असून, ग्राहकांनी नवीन भाजीपाला मार्केटमधून भाजीपाला खरेदी करावा, असे आवाहन नगरपंचायतीतर्फे करण्यात आले. शहरात अनेक वर्षांपासून भाजी विक्रेत्यांचा प्रश्न प्रलंबित होता.

येथील भाजी विक्रेत्यांना आपले हक्काचे ओटे मिळावेत म्हणून नगरपंचायतीच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून ६३ लाख रुपये खर्च करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील जुन्या धर्मशाळेच्या जागी भाजी विक्रेत्यांसाठी ५९ ओट्यांचे बांधकाम करण्यात आले. गेल्या तीन वर्षांपूर्वीच हे बांधकाम झाले. जुलैमध्ये या ओट्यांचा लिलाव नगरपंचायतीतर्फे करण्यात आला होता. अखेर पाच महिन्यांनंतर गुरुवारपासून या मार्केटमध्ये भाजी विक्रीसाठी त्यांना आपल्या हक्काच्या जागेवर भाजीपाला विकण्यासाठी भाजी मार्केट सुरू करण्यात आले. शहरात शंभराहून अधिक भाजी विक्रेते व फळ विक्रेते असून, इतर विक्रेत्यांचा प्रश्न लवकरच मार्गी लावा, अशी मागणी आता होत आहे. गेल्या ३८ वर्षांपासून शिंदखेडा शहरात भाजी मार्केटचा प्रश्न प्रलंबित होता. अनेक वर्षांपासून भाजी बाजार मुख्य रस्त्याच्या दुतर्फा भरत आहे. विक्रेत्यांसाठी हक्काची जागा, ओटे मिळावेत, अशी मागणी अनेक वर्षांपासूनची होती. नगरपंचायतीमार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून ६३ लाख रुपयांच्या खर्चातून येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील जुन्या धर्मशाळेच्या जागेवर ५९ ओटे बांधण्यात आले.

अभिनेत्यांच्या शानदार सादरीकरणाने रंगली एकपात्री अभिनय स्पर्धा

धुळ्यातील नाट्य कलावंतांचे उत्तम सादरीकरण : परिक्षक श्रीनिवास नार्वेकर

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने जानेवारी ते मे २०२४ महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्याअंतर्गत महोत्सव १५ जानेवारीपासून सुरू झाला आहे. यात धुळ्यात दि २८ रोजी एकपात्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

नाट्य परिषदेच्या धुळे जिल्हा शाखेतर्फे देखील विविध स्पर्धा सुरु असून रविवार दि. २८ जानेवारी रोजी पत्रकार भवन, साक्री रोड येथे एकपात्री स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कलावंत देखील सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उदघाटन धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मिलिंद बैसाणे व धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे यांच्या हस्ते करण्यात आले. तर व्यासपीठावर मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, परीक्षक परिक्षक श्रीनिवास नार्वेकर, परिक्षक प्रदीप राणे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिन बागुल, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे कार्यकारणी सदस्य प्रा. मोहन मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद बैसाणे यांनी कलाकाराने छोट्या मोठ्या कला आत्मसात केल्या पाहिजेत.त्या सादर देखील केल्या पाहिजेत. असे सांगत कलाकारांना मार्गदर्शन केले.यावेळी मनोज गर्दे यांनी देखील कलाकारांचे कौतुक करत मार्गदर्शन केले.

कलाकारांना मार्गदर्शन करतांना चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले कि, सर्व स्पर्धकांनी चांगला अभिनय केला. परंतु नाटकांची माहिती घेत. नवनवीन देखील शिकत राहावे. शेवटच्या पायरी पर्यंत यश कसे प्राप्त करता येईल यासाठी परिश्रम देखील घेतले पाहिजे असे देखील कलाकरांना मार्गदर्शन करताना सांगितले. या स्पर्धेतील सहभागी कलाकारांना प्रशस्तीपत्र देखील देण्यात आले. तर या स्पर्धेचा निकाल आज जाहीर करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील एका विजेत्यास विभागीय स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. त्यानंतर उपांत्य अंतिम फेरी होईल. अशा तीन फेऱ्यांमध्ये ही स्पर्धा होईल. त्यानंतर मुंबई येथे अंतिम फेरीचे आयोजन केले आहे. अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी चार दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन केले असून, व्यावसायिक कलावंतांसह महाराष्ट्रातील हौशी कलावंतांना नाट्यसंमेलनात कला सादर करण्याची संधी या नाट्यकलेचा जागरमधून मिळणार आहे.

धुळे शाखेतर्फे परिक्षकांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कलाकारांनी संहिता स्वतः लिहली : श्रीनिवास नार्वेकर

परिक्षक श्रीनिवास नार्वेकर यांनी देखील कलरकरांना मार्गदर्शन करताना सांगितले कि, सर्वांचे आवाज खणखणीत होते. अनेकांनी संहिता स्वतःलिहली होते. तसेच धुळ्यातील कलाकारांचे कौतुक देखील त्यांनी केले. त्यांना शुभेच्छा देखील दिल्या.

या स्पर्धकांनी नोंदविला सहभाग

चंद्रकांत पाटील, शशिकांत नागरे, किसन पाटील, स्वराज सावंत, राहुल मंगळे, साहिल तुपे, घनश्याम माळी यांनी सहभाग नोंदवला होता.

व्यासपीठ मिळाले

माझ्या पहिला एकपात्री प्रयोग होता. लहान स्पर्धाची आवड होती. प्रयत्न करत राहिलो व मला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेमुळे व्यासपीठ मिळाले आहे.

अमृत काळातील महोत्सवी प्रजासत्ताक

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. तब्बल २०० वर्षांच्या ब्रिटिश राजवटीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर १९५० मध्ये भारतीय राज्यघटना तयार करण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० रोजी या राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानिमित्त दरवर्षी प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद पहिल्यांदाच राष्ट्रपती म्हणून एका बग्गीतून राष्ट्रपती भवनातून बाहेर आले, जिथे त्यांनी प्रथमच लष्करी सलामी घेतली आणि त्यांना प्रथमच गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. तेव्हापासून या मार्गावर हा संचलन सोहळा सुरू झाला. या दिवशी भारताच्या विविधतेचे आणि संस्कृतीचे आणि लष्करी सामर्थ्यांचे प्रदर्शन केले जाते. यावर्षी स्वतंत्र भारताचा ७५ वा म्हणजेच अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिन आपण साजरा करत आहोत. देशाचे राष्ट्रपती या कार्यक्रमात सहभागी होऊन ध्वजारोहण करतात. भारतीय प्रजासत्ताक दिनाची सर्व तयारी राजधानी दिल्लीतील कर्तव्यपथावर झाली आहे. पहाटेच्या कडक्याच्या थंडीत ही तयारी करण्यात आली. या संचलनात देशाचे लष्करी सामर्थ्य, विविधतेचे, संस्कृतीचे आणि लष्करी सामर्थ्यांचे प्रदर्शन केले जाते. यंदा प्रजासत्ताक दिनानिमित्त चित्ररथ संचलनात सहभागी होणारा महाराष्ट्राचा चित्ररथ शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्ष महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बनविण्यात आला आहे.

या वर्षाच्या प्रजासत्ताक दिन चित्ररथ संचलनात २८ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश यांच्याकडून विकसित 'भारत' आणि 'भारत लोकशाहीची जननी' या दोन संकल्पनांवर आपल्या चित्ररथाच्या संकल्पना सादर करण्यास केंद्र शासनाने विविध राज्यांना कळविले होते. त्यास अनुसरून विविध विषयांवर केंद्र शासनास संकल्पनांचे सादरीकरण करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे ३५०वे शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यमंत्री मुनगंटीवार यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार श्री शिवराज्याभिषेकाचा ३५० वा महोत्सव आणि लोकशाहीची प्रेरणा या विषयांची सांगड घालून 'लोकशाहीचे प्रेरणास्थान : छत्रपती शिवाजी महाराज' या संकल्पनेवर आधारित सादरीकरण संरक्षण मंत्रालयास करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आजही सर्वांना प्रेरणादायी आहे. महाराजांनी रयतेला सुखी करण्यासाठी स्वराज्याची स्थापना केली. नवी दिल्ली येथे साकारण्यात येणाऱ्या चित्ररथावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बालपणापासून ते स्वराज्य निर्मितीपर्यंतचे प्रसंग दर्शविण्यात आलेले आहेत. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचे सर्वात महत्त्वाचे आकर्षण असते ते कर्तव्यपथावर होणारे लष्करी संचलन. या भव्य संचलन सोहळ्यात सशस्त्र दलांच्या क्षमतेचे प्रदर्शन घडवले जाते. त्यात भारतीय शस्त्रांचे प्रदर्शन, लष्करी क्षमता यांसह अनेक चित्तथरारक कवायती देखील सादर केल्या जातात. यावर्षी भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या वर्षी स्त्री शक्तीचे महत्त्व हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य असणार आहे. कर्तव्यपथ हा राष्ट्रपती भवन ते इंडिया गेटपर्यंतचा मुख्य रस्ता आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात या मार्गावर अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. ब्रिटिशांनी १९११ मध्ये कोलकाता येथून राजधानी दिल्ली येथे हलवली. दिल्ली शहरातील मध्यवर्ती असलेल्या या रस्त्याला किंग्स वे या नावाने ओळखले जात असे. स्वातंत्र्यानंतर या मार्गाचे नाव राजपथ ठेवण्यात आले. स्वातंत्र्य मिळाल्यावर या मार्गावर पहिल्यांदा संचलन करण्यात आले. दरम्यान, २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद पहिल्यांदाच राष्ट्रपती म्हणून एका बग्गीतून राष्ट्रपती भवनातून बाहेर आले, जिथे त्यांनी प्रथमच लष्करी सलामी घेतली आणि त्यांना प्रथमच गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. तेव्हापासून या मार्गावर हा संचलन सोहळा सुरू झाला. भारताच्या लोकशाहीचे, सार्वभौमतेचे हा सोहळा जणू प्रतीकच आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त, पोलीस, अग्निशमन सेवा, गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण दल आणि सुधार सेवेतील एकूण ११३२ कर्मचाऱ्यांना शौर्य/सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. विविध पदकांची सन्मान करण्यासाठीची संपूर्ण पदक व्यवस्था तर्कसंगत करण्यासह त्यात परिवर्तन करण्याच्या दृष्टीने गेल्या काही वर्षांत सरकारने अनेक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी रश्मी करंदीकर यांचा राष्ट्रपती पदकाने सन्मान केला जाणार आहे. त्यांनी दिलेल्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी त्यांना हे पदक दिले जाणार आहे. महाराष्ट्रातल्या ७८ पोलीस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहेत. त्यामध्ये रश्मी करंदीकर यांचे नाव पहिले आहे. रश्मी करंदीकर या सध्या अतिरिक्त पोलीस महासंचालक या पदावर कार्यरत आहेत.तसेच संजय जाधव, राजेश्वरी कोरी, रवींद्र चारदे, अरुण परिहार, अमित तिमांडे आणि योगेश जाधव या अन्य अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. तर देशभरातल्या एकूण ७५३ अधिकाऱ्यांना हा सन्मान जाहीर झाला आहे.

ऑनलाईन वस्तू घरपोच मागवताना..... !

सध्याचे युग हे ऑनलाईन युग आहे असे म्हटले जाते. कारण आज सर्वकाही ऑनलाईन खरेदी करता येते आणि ऑनलाईन विकताही येते. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे या फोनमध्ये वस्तूंची ऑनलाईन विक्री करणारे किमान ४-५ अँप्स तरी नक्कीच आहेत. पाण्याच्या बाटलीपासून सोन्याच्या दागिन्यांपर्यंत सर्वच वस्तू, खाद्यपदार्थ ऑनलाईन पद्धतीने आणि तेही सवलतीच्या दरात घरपोच मागवता येतात. हल्ली तर ताज्या भाज्या आणि ताजी फळेही ऑनलाईन मिळू लागली आहेत, त्यातही तुम्हाला ती सेंद्रिय पद्धतीने पिकवलेली हवी असतील, तर तशी सुविधाही उपलब्ध आहे. शहरासारख्या ठिकाणी लोकांकडे पैसे जास्त आणि वेळ कमी असल्याने बाजारात जाऊन वस्तूंची निवड करणे आणि त्यांची खरेदी करण्यासाठी गर्दीतून वाट काढत जाणे, दुकानदाराशी भावतोल करणे वेळकाढूपणाचे वाटू लागले आहे. कधीतरी विरंगुळा म्हणून विंडो शॉपिंग ठीक आहे, मात्र गरजेच्या वस्तू मागवण्यासाठी हल्ली ऑनलाईन संकेतस्थळांनाच प्रथम पसंती मिळू लागली आहे. अर्थात आजही ऑनलाईन शॉपिंग करणारा एक विशिष्ट्य वर्ग असून त्याची संख्या दिवसागणिक कमालीची वाढू लागली आहे. त्यातही ऑनलाईन खरेदी व्यवहारात फसवणूक झाली नसेल तर ऑनलाईन खरेदीवरील विश्वास अधिक दृढ होऊन अधीकाधीक वस्तू ऑनलाईन मागवण्याकडेच अशांचा कल असतो. रोजच्या घरच्या जेवणाचा कंटाळा आला असेल, तर हॉटेलमधील लज्जतदार जेवण घरी ताटापर्यंत आणून देणारी स्विगी-झोमॅटो सारखी संकेतस्थळे दिवसातील २४ तासांपैकी झोपेचे ७-८ तास वगळता उरलेला वेळ आपल्या सेवेसाठी तत्पर असतात. किराणा माल, इलेक्ट्रॉनिक वस्तू, घरातील भांडी-कुंडी, फर्निचर, औषधे, पुस्तके, शोभेच्या वस्तू, भेटवस्तू, सर्व प्रकारचे कपडे, बेडशीट, सौंदर्य प्रसाधने, पूजेचे साहित्य सर्व काही ऑनलाईन उपलब्ध करून देणारी असंख्य संकेतस्थळे आज कार्यरत असून त्यामध्ये नवनवीन संकेतस्थळांची भरच पडत आहे. सणांच्या निमित्ताने केली जाणारी खरेदीही हल्ली ऑनलाईन पद्धतीनेच होऊ लागली आहे. वाढती ग्राहक संख्या लक्षात घेता या संकेतस्थळांमध्ये आपसांत कमालीची स्पर्धा सुरु असते. त्यासाठी प्रत्येक संकेतस्थळांकडून विविध ऑफर्स आणि सवलती दिल्या जातात. १५ मिनिटे ते २४ तासांत डिलिव्हरी देण्याचे आश्वासन दिले जाते. पूर्वी केवळ सणांच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या विशेष सवलती महिन्यातील मोजके दिवस सोडल्यास वर्षभर चालूच असतात. 'विंटर सेल', 'समर सेल', 'हाऊसफुल सेल', 'धमाका ऑफर' यांसारख्या वेगवेगळ्या गोंडस नावांनी ग्राहकांना आकर्षित करण्याची स्पर्धा या संकेतस्थळांवर बाराही महिने सुरु असली, तरी त्यामधून लाभ

हा ग्राहकाचाच होतो ही एक जमेची बाजू आहे. या ऑनलाईन कंपन्या थेट उत्पादक कंपन्यांकडून उत्पादने घेत असल्याने त्यांना ती अत्यंत अल्प दरात मिळतात त्यामुळे ग्राहकांना ती आपला लाभ वजा करून स्वस्त दरात देणे त्यांनाही परवडते. या सर्वांचा परिणाम परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांवर होऊ लागला आहे, हे जरी सत्य असले तरी ऑनलाईन खरेदीत लोकांचे ४ पैसे वाचत असल्याने त्यांचा अधिक कल त्याकडेच असतो.

ऑनलाईन वस्तू पुरवणाऱ्या संकेतस्थळांची आणि त्यावर खरेदी करणाऱ्यांची संख्या कमालीची वाढल्याने खरेदी केलेल्या वस्तूंची घरपोच डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्यांना सुगीचे दिवस आले आहेत. या कंपन्यांना कामगारांची सतत निकड असल्याने याठिकाणी सातत्याने भरती सुरु असते. स्वतःची दुचाकी असेल आणि थोडेफार इंग्रजी वाचता येत असेल, तर या डिलिव्हरी कंपन्या तुम्हाला हमखास नोकरीला ठेवतात. यानिमित्ताने तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. कोरोना काळात अनेक खासगी कंपन्या बंद पडल्याने तरुणांवर बेरोजगारीचे मोठे संकट ओढवले होते. त्याच काळात ऑनलाईन खरेदी करून घरपोच वस्तू पुरवणाऱ्या संकेतस्थळांना 'अच्छे दिन' आले असल्याने याठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला. या प्रतिकूल काळात ज्यांच्या नोकऱ्या गेल्या अशा आयटी इंजिनिअर्सनीही डिलिव्हरी बॉय म्हणून नोकऱ्या केल्या आहेत. डिलिव्हरी बॉय म्हणून नोकरी कारण्याठी विशेष शैक्षणिक अर्हता गरजेची नसल्याने भरती होणारे कर्मचारी कोणत्या प्रवृत्तीचे आहेत आणि कुठल्या ठिकाणाहून आले आहेत याची विशेष खबरदारी या डिलिव्हरी कंपन्यांकडून घेतली जात नसल्याचे काही ठिकाणी लक्षात आले आहे.

जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

डिलिव्हरी करणाऱ्या डिलिव्हरी बॉयकडे आपला पत्ता आणि मोबाईल क्रमांक असल्याने या पत्याचा आणि मोबाईल क्रमांकाचा गैरवापर केला गेल्याच्या अनेक घटना मध्यंतरी उघडकीस आल्या. आर्थिक फसवणुकीचे आणि ब्लॅकमेलींगचे अनेक प्रकार घडले. ऑनलाईन ग्रोसरी आणि साहित्य पुरवणाऱ्या एका कंपनीच्या शहजाद शेख नामक डिलिव्हरी बॉयने मुंबईतील खार येथील एका ग्राहक युवतीचा विनयभंग केल्याची घटना गतवर्षी घडली होती. याच वर्षी ऑक्टोबर महिन्यात नोएडा येथे ऑनलाईन मागवलेले किराणा सामान घेऊन गेलेल्या डिलिव्हरी बॉयने घरात तरुणी एकटी असल्याचे पाहून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. गेल्या वर्षी मार्च महिन्यात ठाण्यात एका डिलिव्हरी बॉयने पाणी पिण्याच्या निमित्ताने घरात प्रवेश मिळवला आणि घरातल्यांना चाकूचा धाक दाखवून १० लाखांचा ऐवज लंपास केला होता, याच वर्षी सप्टेंबर महिन्यात पुण्यामध्ये डिलिव्हरी बॉयने ग्राहक तरुणीकडे चक्क शरीरसुखाची मागणी केली होती. नाशिकमध्ये एका गृहस्थांनी मागवलेले ४ लाख किमतीचे आयफोन डिलिव्हरी बॉयने परस्पर लंपास केल्याची घटना याच वर्षी जून महिन्यात घडली(असे अनुभव अनेकांना आले आहेत.)याशिवाय पाणी पिण्याच्या, मोबाईल चार्ज करण्याच्या बहाण्याने घरात घुसून घरातील मौल्यवान साहित्य पळवणे, दाराबाहेरील शोभेच्या वस्तू, शूज पळवणे, ग्राहकांशी हुज्जत घालणे, ग्राहकांना मारहाण करणे यांसारखे अनेक प्रताप डिलिव्हरी बॉईजने केलेले आहेत. अर्थात या सर्व नकारात्मक घटना असल्या, तरी उन्हाताऱ्हात, थंडी पावसात ग्राहकांचे पत्ते शोधत ग्राहकांना घरपोच वस्तू पोहोचवण्याचे कष्टाचे कामही हेच डिलिव्हरी बॉईज करत असतात. त्यांच्या मेहनतीच्या आणि प्रामाणिकपणाच्याही अनेक कथा आहेत. ऑनलाईन वस्तू मागवणाऱ्या ग्राहकांसाठी डिलिव्हरी घेऊन येणारा इसम हा अनोळखी असतो त्यामुळे प्रत्येक ग्राहकाने सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे. ऑनलाईन मागवलेली वस्तू घरपोच मिळत असल्याने अनेकदा ती घेण्यासाठी इमारतीचे दोन मजले उतरण्याची किंवा घराबाहेर रस्त्यावर येण्याची तसदीही आपण घेत नाही. वस्तू दारात मिळण्याचा आपला अट्टाहास असतो. एरव्ही मोबाईलवर आलेला अनोळखी क्रमांक पाहून फोन न स्वीकारणारे आपण अनोळखी डिलिव्हरी बॉयला थेट घरापर्यंत बोलावतो. सर्वच डिलिव्हरी बॉय प्रामाणिक असतात असे नव्हे. ज्या वस्तू आपण सहज घरी घेऊन जाऊ शकतो त्या वस्तू थेट दारापर्यन्त मागवण्याची आवश्यकता आहे का ? इमारतीच्या खाली किंवा जवळच्या रस्त्यावर जाऊन त्या घेण्याचा त्रास आपण का घेत नाही ? वस्तू घरपोच मागवताना आपण सोबत स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची असुरक्षितताही घेऊन येत आहोत याचेही भान असायला हवे,

रामराज्य हेच आदर्श प्रजासत्ताक!

सोमवार २२ जानेवारी २०२४ हा दिवस भारताच्या यापुढील कार्यकाळात सुवर्ण अक्षराने कायम झळकत राहणार आहे. तो क्षण ज्यांनी अनुभवला त्यांनी आपल्या पिढ्यांना धन्य केले. अयोध्येच्या भूमीच्या संरक्षणासाठी ज्यांनी सन १५ व्या शतकापासून प्राणांचे बलिदान केले, ज्यांनी करसेवेत छातीवर गोळ्या झेलल्या त्या सर्वांना याच दिवशी मुक्ती मिळाली. श्रीराम मूर्तीच्या प्राण प्रतिष्ठासमयी लाखो डोळ्यांतून अश्रूधारा वाहत होत्या. श्रीराम हे भारतीय जनमानसाच्या रक्तात, मातीत, संस्कृती आणि संस्कारात सम्मिलीत आहेत. राम म्हणजे आत्मतत्व. राम म्हणजे चैतन्य. राम म्हणजे सत्व. राम वगळून जीवन म्हणजे जणू शून्य वा निश्चल अवस्था. अशी अवस्था हिंदू समाज गेले ५ शतके सहन करत होता. त्याच्या मानसिक कोंडीची आणि त्याला आत्मसन्मान मिळवून देण्याची तसदी कोणीही घेतली नाही. किमान देश स्वतंत्र झाल्यावर तरी हिंदूंकडे त्यांच्या आराध्य आणि पूजनीय श्रध्दास्थानांना सोपवायला हवे होते; पण तसे झाले नाही. मूळ राज्य घटनेच्या पृष्ठांवर राम, कृष्ण यांच्या जीवनातील अनेक प्रसंग चितारलेले आहेत. जे रामसुत्र चराचर व्यापून आहे ते जर आपण देश स्वतंत्र आणि प्रजासत्ताक झाल्यावर विसरलो तर मग राष्ट्र निर्माण कसे होणार? राम राज्य म्हणजे सत्य आणि धर्म परायणतेची पराकाष्ठा. तुझे ते तुझे आणि माझे तेही तुझे याचे अनुपम रूप म्हणजे राम राज्य. पितृआदेशाचे यथार्थ पालन म्हणजे राम राज्य. लक्ष्मण आणि भरत रूपाने बंधूभावाचे अमोघ दर्शन म्हणजे राम राज्य. जानकीची पतीसेवा आणि अनन्य निष्ठा म्हणजे रामराज्य. ग्राम्य, अकुशल, निर्धन, वनजन, गिरिजन, आदिवासी, वानर यांची एकता म्हणजे राम राज्य. ऋषी, मुनी, संत, संन्यासी, नागा, बैरागी, महंत यांची पूजा आणि त्यांच्याकडून ज्ञानग्रहण म्हणजे राम राज्य. चार पुरुषार्थ आणि चार संस्थांचे संवर्धन म्हणजे राम राज्य.

रामराज्य आणि राममार्ग

असे हे राम राज्य आपण देश स्वतंत्र झाल्यावर प्राप्त केले का? समता, समानता, न्याय, नीति आपण आणू शकलो का? शीलवान आणि लाचारीहीन समाज आपण उभा करू शकलो का? देशातील सारे नागरिक माझे देशबांधव आहेत असे म्हणून बंधुभाव उभा राहिला का? स्वतंत्र आणि प्रजासत्ताक होऊन जर आपण फक्त संविधानिक पदे आणि शिष्टाचाराचे अवडंबर माजवले असेल, तर मग सन १९४७ ते आजपर्यंत आपली आत्मिक आणि वैचारिक उन्नती फार झाली नाही, असे म्हणावे लागेल. राम मंदिर झाल्याने सर्व प्रश्न सुटले का असा प्रश्न काही लोक विचारत आहेत. राम मंदिराऐवजी तिथे रुग्णालय का नाही बांधले असाही सवाल काही लोक करत आहेत? अशा लोकांनी हे लक्षात घ्यावे की, सनातन विरोधी लोकांनी राम आणि रामायण मार्ग त्यागला आणि देश जटील प्रश्नांच्या गर्तेत सापडला. राम मंदिराच्या आधी देशात अनेक रुग्णालये, गरिबांना पक्की घरे देण्यात आली आहेत. यापुढेही दिली जातील.

भारतीय सनातन धर्ममानस देवभोळे आहे. ते सश्रद्ध आहेत तसेच ते वीर आहेत. आपल्या मराठी लोकांचेच उदाहरण घेऊया. हे धर्ममानस 'येळकोट येळकोट जय मल्हार' म्हणत तळीभंडार करताना प्रखर झुंजार आहेत. 'हर हर महादेव' म्हणताना ते सह्याद्री घाव आहेत. 'जय जगदंब' म्हणताना ते करारी आहेत. खंडोबाच्या वा ज्योतिबाच्या नावानं चांगभलं म्हणताना ते निश्चयी आहेत. देशाच्या सर्व प्रांतात धर्ममानस असेच आहे. कुठे बोल बजरंग बली की जय, तर कुठे जो बोले सो निहाल सत श्री अकाल. कुठे जय महाकाली, आयो गोरखाली, तर कुठे दुर्गामाता की जय. संपूर्ण भारतीय जनमानस हे अवघे सनातन रूप आपल्या रोमारोमात भिनवून जगत असेल आणि त्यांच्या व्यवसाय ते वर्तन, वाणी ते व्यवहार यात रामनाम सामील असेल तर त्यात त्यात वावगे ते काय?

शांततेचा मार्ग

देशाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आणि आता आपण प्रजासत्ताकाचा अमृत महोत्सव लवकरच साजरा करणार आहोत. पण हे करत असताना आपण स्वातंत्र्य मिळवूनही काय गमावले आणि प्रजासत्ताक करूनही काय कमावू शकलो नाही याचा आपण जरूर विचार करायला हवा. जे गमावले ते पुन्हा मिळवण्याची सुरुवात करावी लागेल. प्रजासत्ताक होऊनही जे कमावू शकलो नाही ते आता राम राज्य आणून कमावले पाहिजे. राममार्ग हा विकास, शील आणि शांततेचा मार्ग आहे. धर्म, शिक्षण, कुटुंब, राज संस्थांच्या उन्नयनाचा मार्ग आहे.

कलियुगाचा आधार

रामाच्या आगमनाने आता विजयाकडून विनयाकडे जायचे आहे असा विचार पुढे आला. राष्ट्र निर्माणाचा संकल्प पुढे आला. विकसित राष्ट्र बनवण्याचे धोरण पुढे येत आहे. मानवतेचा संदेश पुढे येतो. वसुधैव कुटुंबकम् ही भावना दृढ होऊ पाहते. सारे जग आता भारताकडे आशेने पाहत आहे. श्री राम मंदिर प्राण प्रतिष्ठापना सोहळा सार्या जगाने पाहिला. रामनामाची धून जगभर आळवली गेली. देश, प्रांत, भाषा ओलांडून दूरवर अनंतापर्यंत राम आहेत.

राष्ट्रनिर्माण २२ जानेवारीचा सोहळा झाल्यावर दुसर्या दिवशी ५ लाख भाविकांनी रामाचे दर्शन घेतले. अयोध्येत लाखो भाविकांना २ महिने भोजनासाठी, प्रसादासाठी पुरेल इतका कोरडा शिधा सनातन पुजकांनी जमा केला आहे. भाविकांनी आतापर्यंत राम मंदिरासाठी न्यासाकडे साडे पाच हजार कोटी रुपये जमा केले आहेत. त्याच्या व्याजातून मंदिर उभारणीचा खर्च भागवला जात आहे. भरभरून दान येत आहे. या दानातून रुग्णालय, शाळा, ग्रंथालय उभारली जाऊ शकतात. राम मंदिरामुळे अयोध्या, उत्तर प्रदेश आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे. जे रामाला डोळेभरून पाहून धन्यता अनुभवू शकतात ते रामाचा आदर्शही जोपासू शकतात. कोट्यवधी हिंदूंचे राम मंदिर उभारणीचे स्वप्न प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर सत्यात उतरले आहे. आता राष्ट्र उभारणी, आदर्शांची जोपासना, शील संवर्धन घडून आणण्यासाठी सर्व सनातनी कटीबद्ध होत आहेत.

देश प्रजासत्ताक होत असताना सर्वांना अधिकार जसे प्राप्त झाले तशी जबाबदारीही प्राप्त झाली. धर्म निरपेक्षतेची पालखी वाहणे ही फक्त हिंदूंची नाही, तर इतर पंथीयांचीसुद्धा जबाबदारी आहे. हिंदूंना आणि त्यांच्या पूजनीय देवतांना अपमानित करणारा समाज आणि राष्ट्र हे अंधार भवितव्य आहे, हे आपण आता पुरते अनुभवले आहे. हिंदूंच्या सहिष्णुतेने मंदिर उभारणीचा मार्ग घटनात्मक मार्गाने गेला. इतर कुठल्या कट्टर, धर्मांध शक्तींनी हे केले असते? मुळीच नाही. राम, रामायण वंदनीय आहे. सनातन हा या भूमीचा श्वास आणि ऊर्जा आहे. राम हे त्याचे साकार रूप आहे. राम मंदिर ही राम राज्याची सुरुवात आहे. राम राज्य हेच सनातन प्रजासत्ताक आहे. गरज आहे आज ते समजून घेण्याची. राम मंदिर साकार होण्याचा तोच अन्वय आणि रामराज्य अनुभूतीचा तोच अर्थ आहे.

- सुरेश कोडीतकर

शब्दकोडे-३०६



आडवे शब्द -

१. दया ३. मांडी ५. अदबीने १०. वस्तू, जिन्नस ११. काथ्यकूट, तीच-ती चर्चा १२. तात्पर्य १३. थापा मारणारा १५. सुवर्ण १७. दुधाचे पक्वान्न १९. सूर्यमालेचा घटक २०. एक ज्वालाग्राही पदार्थ २१. भाताचा एक चवदार प्रकार २२. पुरेसे, पुष्कळ २४. सर्व २६. कुटील बेत, कारस्थान २७. भ्रम, जादू २८. घर २९. पश्चात्ताप ३२. परतंत्र ३३. आकर्षण, लोभ ३४. जमीन ३५. ढग ३७. विष ४०. आई ४१. सूर्य ४२. चांगले नशीब ४३. जाणुनबुजून, हेतूतः ४५. पवित्र ४७. देवदासची प्रेयसी ४८. अभिनेता ४९. भय ५१. नशीब ५२. पती ५४. अधीन ५५. सगळ्यात महाग रत्न ५६. औषधी मात्रा उगाळण्याचा दगड ५७. सरबताचे आंबट फळ ५९. गाढव आणि ससा ६१. जास्त वजनाचे ६३. मोठ्या आकराचे ६५. जोखड ६६. मासा ६८. श्रीमंत ७०. उद्यान ७२. कावळा ७३. थोर ७५. वृक्ष ७६. पुष्कळ ७७. पोट ७८. अशक्य, टोकाचा ७९. राजाची आई ८१. केसांचा कृत्रिम रंग ८२. राजाची गाडी ८३. जंगल ८४. कसोटी

उभे शब्द -

१. गोंगट २. धाक ३. स्वीकार ४. सोन्याचे शुद्धतेचे प्रमाण ५. अजून ६. पृथ्वी ७. पुराचा फटका बसलेले ८. गोष्ट ९. वेळ दाखवणारे यंत्र १४. अंत, मर्यादा १६. नवीन १८. कुमक २२. भिववणारे २३. सेतू २५. आर्जवे, अजीजी २६. वस्त्र २७. चोप २८. निर्हेतुक, लीलया ३०. प्रखरता, तीष्णता ३१. चमत्कारिक ३२. पावलांचा आवाज ३६. मातीचे पात्र बनवणारा ३८. सहस्रावधी ३९. पुच्छ ४०. शेवटचा मणका ४४. सिंह ४५. शंकराचे प्रतीक ४६. एखाद्या भरवशावर राहणे ४७. बंध ५०. युद्धभूमी ५३. उसाचा काकवीपेक्षा दाट रस ५४. रंग ५५. डासामुळे होणारा आजार ५८. तळ, खालचा भाग ६०. काव्य ६२. बारा ६३. टोक ६४. बांधून ठेवणारी गोष्ट ६७. बकरा ६९. अवास्तव, खूप जास्त ७०. परका, बाहेरून आलेला ७१. ---- महावीर-जैनांचे तीर्थंकर ७२. कथेपेक्षा दीर्घ वाङ्मय प्रकार ७३. सहाय्य ७४. पराभव ७५. मनातील भावना, मनोव्यापार ७८. स्वाभाविक आवड, प्रवृत्ती ८०. किंचित

शब्दकोडे-३०५ चे उत्तर

आडवे उत्तर

६.अंगरक्षक ९.जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ११.पितामह १४.वाईट १६.चाकवत १८.ममी १९.चक्रम २१.सदाशिव २२.दळ २३.पातक २८.पाणी २९.लंकेची पार्वती ३२.चकमक ३३.साद ३४.दारमदार ३५.टक्के ३६.रत ३८.फी ४०.वाढ ४२.डच्चू ४३.समर ४४.पाटा ४५.दणका ४६.गारठा ४७.आवर ४८.वाली ४९.रंक ५०.फत्ते ५१.प्रज्ञा ५२.उसंत ५३.आंध्र ५४.गोड ५५.ऐरावत ५७.ऊस ५९.तपकीर ६१.ईर ६३.रास ६४.जननी ६५.यज्ञ ६६.मालदार ६८.रोग ६९.सतत ७०.भुई ७१.आमदार

उभे उत्तर

१.तजेला २.आजारी ३.नातेवाईक ४.फितूर ५.आझाद ६.अंगारक ७.गती ८.क्षमता १०.नेहमी ११.पितळ १२.ममता १३.चक्रपाणी १५.सदा सर्वदा १६.चावट १७.वदन २०.मत २४.कलंदर २५.प्राचीन २६.वाकडा २७.ढकलाढकली २८.पाकीट ३०.तीरकामठा ३१.उदास ३७.तडकाफडकी ३९.मटार उसळ ४१.उदक ४३.सरबराई ४४.पाव ४७.आज्ञा ४८.वात ४९.रंध्र ५१.प्रत ५३.आंबा ५४.गोप ५६.वरमाई ५८.खासदार ५९.तन ६०.रयत ६२.अंदाज ६४.जग ६७.जोम

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

सुधाकर बडगुजर यांना जामीन मंजूर

नाशिक । भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये दाखल गुन्ह्यातील संशयित शिवसेना ठाकरे गटाचे महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर यांना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्याने त्यांना दिलासा मिळाला आहे.कुख्यात दाऊद इब्राहिमचा साथीदार सलीम कुत्ता याच्याबरोबर पार्टी केल्याच्या संशयाने अडचणीत आलेले ठाकरे गटाचे नाशिक महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या विरोधात बनावट कागदपत्रे सादर करत महापालिकेची फसवणूक केल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे.

मोबाइल चोरटा पोलिसांनी पकडला

धुळे । शहरातील शंभरफुटी रोडवरील मोबाइलचे दुकान फोडून ५४ हजार ७४० रुपयांचा ऐवज चोरून नेणाऱ्या चोरट्याला चाळीसगावरोड पोलिसांनी शिताफीने जेरबंद केले. त्याच्याकडून चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत केला. ही घटना बुधवारी पहाटे घडली होती. अरबाज उर्फ बबलू रफिक शेख (वय ३९, रा. बोरसे कॉलनी, चौधरी पेट्रोल पंपाच्या मागे, धुळे) असे अटकेतील संशयिताचे नाव आहे.

आत्मा आणि परमात्म्याच्या मिलनाने स्थापित होते एकत्व

सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांचे प्रतिपादन

महाराष्ट्राच्या ५७ व्या निरंकारी संत समागमास प्रारंभ

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जीवनात जेंव्हा परमात्म्याचा बोध होतो तेंव्हा आत्मा आणि परमात्म्याचे मिलन घडून येते ज्यायोगे आपसुकच एकत्व स्थापित होते. त्यानंतर जीवनात मानवी गुणांचा स्वाभाविकपणे प्रवेश होत असल्याचे प्रतिपादन निरंकारी सदगुरु माता सुदिक्षाजी महाराज यांनी केले महाराष्ट्राच्या ५७ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या शुभारंभ प्रसंगी मानवतेच्या नावाने दिलेल्या संदेशामध्ये निरंकारी सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांनी उक्त उद्गार व्यक्त केले.

या तीन दिवसीय भव्य संत समागमामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने निरंकारी भक्तगण आणि इतर प्रभुप्रेमी भाविक सहभागी झाले आहेत. प्रजासत्ताक दिनाचा उल्लेख करुन सद्गुरु माताजी म्हणाल्या, की प्रजासत्ताक दिनी आपल्या देशाचे संविधान लागू करण्यात आले. अशाच प्रकारे जर मनुष्य मानवीय गुणांचे एखादे संविधान तयार करुन आपल्या जीवनात लागू करेल तर खरोखरच हे जीवन जगण्यायोग्य होऊ शकेल. असे झाले तर मनुष्य द्वेष व भेदभावांचा त्याग करुन प्रेम-नम्रता यांसारख्या दैवी गुणांचा अंगीकार करुन वास्तविक मनुष्य बनून एकमेकांचा सत्कार करु लागेल. केवळ पुस्तकी ज्ञानाने नव्हे तर प्रत्यक्ष ब्रह्मज्ञानाद्वारे संपूर्ण ब्रह्माडाच्या कणाकणात व सर्वांभूती असलेल्या परमात्म्याला पाहूनच मनुष्य मानवतेचा व्यवहार करु शकेल, असे विचार व्यक्त केले. शोभा यात्रेने पारणे फेडले नागपुरच्या सुमठाणा, हिंगणा येथे विशाल मैदानांवर सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या दिव्य आगमनाप्रित्यर्थ भाविक भक्तगणांनी एक भव्य शोभायात्रा आयोजित केली होती . ज्यामध्ये एका बाजुला भक्तगणांनी आपल्या हृदयसम्राट सद्गुरुचे सजल नेत्रांनी भावपूर्ण स्वागत केले. शोभायात्रेमध्ये मिशनच्या शिकवणूकीवर आधारित देश-विदेशातील वेगवेगळ्या संस्कृती व परंपरांचे सुरम्य मिलन झाल्याचे अनुपम दृश्य दाखवुन डोळ्याचे पारणे फेडले .शोभा यात्रेमध्ये दिव्य युगुल एका फुलांनी सुशोभित पालखीत विराजमान होऊन विविध कलांचे व चित्ररथांचे प्रदर्शन करत जाणाऱ्या भक्तगणांचे हार्दिक अभिवादन स्वीकारत होते. तसेच सुहास्य वदनाने आपला पावन आशीर्वादही प्रदान करत होते. शोभा यात्रेमध्ये महाराष्ट्र अनेक शहरांतून व गावखेड्यांतून आलेल्या श्रद्धालु भक्तांनी गीत, संगीत, नृत्य व चित्ररथ इत्यादिच्या माध्यमातून आपल्या कलेचे प्रदर्शन करत सद्गुरु माताजींचे पावन आशीर्वाद प्राप्त केले.

कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी भेट दिली . त्यांनी सद्गुरु माताजी व निरंकारी राजपिताजी यांची भेट घेतली आणि निरंकारी भक्तांना सत्यरूपी परमात्मा व आपल्या सद्गुरुवर निष्ठा व विश्वास बाळगण्याची प्रेरणा दिली. अन्य कित्येक अनुयायांनी देखील गीत, कविता आणि व्याख्यानाच्या माध्यमातून समागमाचा विषय शांती अंतर्मनाची या विषयावर आपले भाव व्यक्त केले.

बीबीएनजी आंतरराष्ट्रीय परिषद ४ फेब्रुवारीला नाशकात

नाशिकचे उद्योजक गोविंद झा, डॉ.रणजीत जोशी यांना उद्यम कौस्तुभ पुरस्कार

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

ब्राह्मण व्यावसायिकांची देशातील सर्वात मोठी संस्था ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल (बीबीएनजी) तर्फे ८ वी आंतरराष्ट्रीय परिषद परिवर्तन ४ फेब्रुवारी रोजी नाशिक येथील गुरुदक्षिणा हॉल येथे होणार असून या परिषदेसाठी जगभरातील नामवंत ब्राह्मण उद्योजक आणि वक्ते येणार आहेत. अशी माहिती बीबीएनजीचे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी दिली.

या नामवंत वक्त्यांमध्ये गीतांजली किर्लोस्कर (चेअरपर्सन अँड एम.डी. - किर्लोस्कर सिस्टीम (प्रा) लि.), रवींद्र साठे (चेअरमन -महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ), सुनील देवधर (जेष्ठ नेते -भारतीय जनता पार्टी,), डॉ.अशोक जोशी (संस्थापक ,मायक्रोलीन एलएलसी,साल्ट लेक सिटी,अमेरिका), योगेंद्र पुराणिक (गॅझेटेड नागरी सेवा अधिकारी, माजी आमदार, जपान), उदय निरगुडकर (संचालक एनएचपीसी), आनंद गानू (अध्यक्ष, गर्जे मराठी ग्लोबल एल एल सी, अमेरिका), गिरीश चितळे (संचालक चितळे डेअरी), डॉ.संजय पैठणकर- दुबई, डॉ.विजय जोशी (डीआरएस कन्सल्टिंग ,सिडनी, ऑस्ट्रेलिया), संजय लोंढे (अशोक बिल्डकॉन), विश्वास पाठक (संचालक महावितरण), विवेक देशपांडे (रुद्रानी इन्फ्रास्ट्रक्चर), सुमित तिवारी (टायमस), शरयू देशमुख (डेल्टा फिनाकेम), अनिल जोशी (जैन इरिगेशन), विष्णू मनोहर (सुप्रसिद्ध शेफ), मंगेश गोंदवले- (व्यवस्थापकीय संचालक, एमआयआयडीसी), अतुल कुर्लेकर -(संचालक, लोड स्टार कम्युनिकेशन्स), ,अभिजित जोग -(सीएमडी,प्रतिसाद ॲडव्हरटायझिंग) ही प्रमुख आहेत .हे वक्ते उद्योगाशी संबंधित अशा विविध पैलूंवर संवाद साधतील.

याशिवाय दरवर्षी बीबीएनजी तर्फे उद्योगांमध्ये भरीव योगदान देणाऱ्या नामवंत उद्योजकांचा गौरव करण्यात येतो. या वर्षी पुढील उद्योजकांना गौरवण्यात येणार आहे.

जीवन गौरव पुरस्कार

सीमा किणीकर-,(सोलापूर) , डॉ. रघुनाथ शुक्ला- (शास्त्रज्ञ, एन सी एल ,पुणे).

उद्यम कौस्तुभ पुरस्कार

कुमार काळे- (नागपूर), आर्की. प्रज्ञा पोंक्षे- (मुंबई), रवळनाथ शेंडे- (कराड), गोविंद झा - (नाशिक), डॉ.रणजीत जोशी -(विम्बल्डन,लंडन व नाशिक), डॉ.संजय पैठणकर- (दुबई)

उद्योजकांचे देशाच्या विकासात मोलाचे योगदान असून देशाचे अर्थकारण व रोजगार निर्मिती मध्ये देखील उद्योजकांची महत्वाची भूमिका असते . या परिषदेचा उद्देश व्यवसायाच्या वाढीसाठी विचारमंथन तसेच उद्योजकता विकास असून

विविध उद्योजकांना भेटण्याच्या आणि नेटवर्कच्या संधींद्वारे व्यवसाय वृद्धीच्या संधी मिळवणे असा आहे. परिषदेमध्ये नवनवीन उत्पादनांचे लाँचिंग व उद्योजकीय कौशल्यांचे प्रदर्शन देखील होणार असून अधिक माहितीसाठी ९८२२७५३२२६ येथे संपर्क साधावा. असे आवाहन परिवर्तन परिषदेचे प्रमुख डॉ.अभिजीत चांदे यांनी केले आहे.

नविन नाशिक सकल मराठा समाजाकडून जल्लोष अन् फटाक्यांची आतषबाजी

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा मोर्चा मुंबईच्या आझाद मैदानावर धडकण्यापूर्वीच २७ जानेवारीला पहाटेच्या सुमारास मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने अध्यादेश काढला. सकाळी ९ वाजताच्या सुमारास नवी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मनोज जरांगे पाटील यांची छोटेखानी जाहिर सभा झाली अन् इकडे जिल्ह्यातही जल्लोष अन् फटाक्यांची आतषबाजी झाली.

मराठा समाजाच्या आरक्षण लढ्याला अभूतपूर्व यश मिळाल्याने नविन नाशिक सकल मराठा समाजबांधवांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला ज्येष्ठ नेते नाना महाले, महिला अध्यक्ष अरुणा पाटील, अण्णा पाटील, मामा ठाकरे, सुभाष देवरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन आशिष हिरे तसेच नविन नाशिक सकल मराठा समाजाचे शिवजन्मो उत्सव समितीचे अध्यक्ष अमोल पाटील यांनी केले होते. यावेळी गुलालाची उधळण, जल्लोष,अन् फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. संजय भामरे, दादा कापडणीस, मकरंद सोमवंशी, राम पाटील, उमेश चव्हाण, योगेश पाटील, हरीश शेवाळे, बाळासाहेब लोंढे, मनोज सावंत, जितेंद्र पाटील, सागर जाधव, मनोज वाघ, शुभम महाले, जितेंद्र पाटील, महेंद्र पाटील, दिनेश नरवडे, सागर शेळके उमेश, चव्हाण, सागर पाटील, दीपक घुमरे, योगेश अहिरे, सुनील अहिरे, दीपक मराठे आदींसह मराठा समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

पेढे वाटत, फटाक्यांच्या आतषबाजीसह शिवरायांच्या घोषणाबाजीने नाशिकमधील मराठा बांधवांनी केला आरक्षण विजयाचा जल्लोष

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघालेला ऐतिहासिक मोर्चा एपीएमसी वाशी मार्केट, नवीन मुंबई या ठिकाणी मराठा आरक्षण प्रश्न मार्गी लागला. हा ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर नाशिक जिल्ह्यामध्ये सर्वत्र जल्लोष करण्यात आला. काल सकाळी सीबीएस येथील शिवतीर्थावर नाशिक जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत पेढे वाटत तसेच फटाक्याच्या आतिषबाजीने विजयोत्सव साजरा करण्यात आला.

या आरक्षण विजया निमित्ताने सर्व प्रथम पत्रकार व पोलीस बांधव यांना पेढे भरवण्यात आले. मराठा समाज बांधवांनी हा आनंद उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला.

यावेळी आरक्षणासाठी ज्यांनी बलिदान दिले असे कै. अण्णासाहेब पाटील, क्रांतीसुर्य अण्णासाहेब जावळे पाटील, अण्णासाहेब येरळीकर, प्रा. देविदास वडजे, कै.विनायक मेटे यांसह शेकडो समाज बांधव ज्यांनी बलिदान दिले त्या सर्वांना या विजयाप्रसंगी श्रद्धांजली नाशिककरांच्या वतीने वाहण्यात आली.

हा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी करण गायकर, नानासाहेब बच्छाव, शिवाजी सहाणे, चंद्रकांत बनकर, हंसराज वडघुले, नितीन रोटे पाटील, डॉ.सचिन देवरे, योगेश नाटकर, सोमनाथ जाधव, संजय फडोळ, मामा राजवाडे, राम खुर्दल, हर्षल पवार, वैभव दळवी, निलेश मोरे, बाळासाहेब लांबे, कैलास खांडबहाले, मुरलीधर पाटील, सचिन पवार, नितीन काळे, संदीप हांडगे, गौरव गाजरे, अजित नाले, ज्ञानेश्वर कवडे, निलेश टुबे, विकी गायधनी, शरद लबडे, उल्हास बोरसे, वत्सला खैरे, एकता खैरे, शिल्पा चव्हाण, रोहिणी उखाडे, ममता शिंदे स्वप्ना राऊत, संगीता सूर्यवंशी, सविता, रूपाली काकडे, दिपाली लोखंडे, स्वाती कदम, माधवी पाटील, महेंद्र बेरे यांसह मोठ्या प्रमाणात समाज बांधव सहभागी झाले होते.

जागतिक कृषी महोत्सवात काही जोडपी मान्यवरांच्या उपस्थितीत विवाहबद्ध

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त



जागतिक कृषी महोत्सव २०२४ दिंडोरी प्रणित स्वामी समर्थ केंद्र सेवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चौथ्या दिवशी डोंगरे वसतीगृह नाशिक या ठिकाणी विशेष करून वधु वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कांचन यादव मुंबई विवाह समुपदेशक यांनी आपली बोलताना सांगितले की, सर्वांना काही मिळत नसते ही जाणीव वैवाहिक बाबतीत ठेवल्यास वैवाहिक जीवन यशस्वी होते. त्याचप्रमाणे घरातील वडीलधाऱ्या माणसांना जपायला शिकले पाहिजे, ती जपणूक केली तर योग्य वय झाल्यावर समज आल्यानंतर आपल्या पाल्याला त्याच्या वैवाहिक जीवनात प्रवेश करण्यासाठी विवाह संस्कार व मुलीकडे मुलीसाठी मातृत्वाच्या माध्यमातून आईने योग्य समज देऊन आपल्या मुलीचा व मुलाचा संसार बिघडणार नाही या दृष्टीतून काळजी घेऊन माणसं जपायला शिकली पाहिजे असे आवाहन केले.

त्या म्हणाल्या की, लग्न जुळवूनही सोपं असतं परंतु त्याची आयुष्यभर गाठ टिकवणे ही मोठी कसरत असते. त्यामुळे संयम व सहनशीलता ही दोघांकडे असणे गरजेचे आहे. वैवाहिक जीवनात मतभेद झाल्यास योग्य समन्वयक किंवा मध्यस्थ मार्फत त्यात योग्य चर्चा करून योग्य मार्ग काढणे हाच एकमेव पर्याय असतो. यावेळी विविध ठिकाणाहून आलेल्या उपवर वराचा वधूचा परिचय त्यांनी करून दिला. याप्रसंगी बाळासाहेब सावंत, डॉ. संजय भावे कुलगुरू कोकण विद्यापीठ, प्रशांत बोराडे शिक्षण तज्ञ संचालक हे उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिन साजरा

शिरपूर । शहरातील सुभाष कॉलनी, वाल्मिक नगर व गुरुदत्त कॉलनी येथे आर. सी.पटेल मराठी प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला असून माजी नगरसेविका आशाताई बागुल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका आशाताई बागुल, शिरपूर तालुका मराठा संघाचे अध्यक्ष नरेंद्र साहेबराव पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजय माळी, मुख्याध्यापक गोपाल पाटील, गणेश साळुंखे, श्रीमती रेखा सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीस मान्यवरांनी ध्वज स्तंभाचे व राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

तान' च्या ट्रॅव्हल प्रदर्शनाचा समारोप

आगामी हंगामाच्या सहलींचे नाशिकरांकडून बुकिंग

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आगामी पर्यटनाच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये ट्रॅव्हल एजंट असोसिएशन ऑफ नाशिक (तान) तर्फे आयोजित तीन दिवसीय ट्रॅव्हल प्रदर्शनाचा समारोप झाला. उन्हाळ्यातील पर्यटन स्थळे जसे हिमाचल, काश्मीर, लद्दाख, युरोप, स्वित्झर्लंड यासाठी पर्यटकांची विशेष पसंती दिसली असून अयोध्या येथील राम मंदिर येथील सहलींबाबत देखील विशेष उत्सुकता दिसून आली. आगाऊ बुकिंगमुळे अनेक फायदे पण पर्यटकांना मिळत असल्याचे चित्र प्रदर्शनात जाणवले. अशी माहिती तानचे अध्यक्ष सागर वाघचौरे यांनी दिली.

गोविंदनगर येथील हॉटेल ट्रीट (मनोहर गार्डन) येथे आयोजित हे प्रदर्शन अनेक अर्थाने ट्रेंड सेटर दिसले. २००२ मध्ये स्थापन झालेल्या ट्रॅव्हल एजंट असोसिएशनमधील सभासद असलेले ट्रॅव्हल एजंट हे पर्यटकांच्या विश्वासास पात्र ठरले आहेत. मधील काही काळात काही पोर्टलच्या फसव्या योजना तसेच नियमित व असोसिएशनचे सभासद नसलेल्या काही ट्रॅव्हल एजंटने पर्यटकांची फसवणूक केली असल्याचे तक्रारी समोर आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर नियमित ट्रॅव्हल एजंट असलेल्या तान सभासदांनी पर्यटकांची विश्वासार्हता मिळवली असल्याचे चित्र या प्रदर्शनानिमित्त दिसून आले असल्याचे देखील सागर वाघचौरे यांनी नमूद केले.

नाशिक व उत्तर महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी देश विदेशातील सहलींचे नियोजन तान सदस्य करत असून त्याचसोबत देश-विदेशातून नाशिक व उत्तर महाराष्ट्रात येणाऱ्या पर्यटकांना विविध सेवा देण्याचे काम देखील ट्रॅव्हल एजंट करत असतात. आगामी कुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकची कनेक्टिव्हिटी वाढावी यासाठी तान प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष मनोज वासवानी, सचिव अरुण सूर्यवंशी, खजिनदार सचित लोणारी तसेच कमिटी सदस्य अमित चंडेल, ईशान जोशी, अंबरीश मोरे, प्रायोजक नोबेल टुरिझमचे सचिन भोळे व ट्रीट हॉटेलचे प्रशांत नायक यांनी सक्रिय सहभाग दिला.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालयाला पुरस्कार

पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी झाला गौरव

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत या वर्षी केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल जिल्हा रुग्णालय नाशिक चा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमात पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते जिल्हा शल्यचिकित्सक डॉ चारुदत्त शिंदे यांना सन्मानपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला. वर्षभरात एकूण ४३८ रुग्णांना या योजने अंतर्गत विनामूल्य शस्त्रक्रिया आणि उपचार जिल्हा रुग्णालयात करण्यात आलेले आहेत.

अस्थिरोग शस्त्रक्रिया, नवजात बालकांवर उपचार, मेंदू विकारावरील शस्त्रक्रिया जळीत रुग्णांवरील उपचार या विभागामार्फत जिल्हा रुग्णालय नाशिक येथे एकत्रित आयुष्यमान प्रधानमंत्री भारत योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनामध्ये रुग्ण समाविष्ट करून त्यांना नि:शुल्क लाभ देण्यात आला. यापुढेही जास्तीत जास्त रुग्णांना लाभ देण्यासाठी जिल्हा रुग्णालय आणि संदर्भ सेवा रुग्णालय प्रयत्नशील असतील.

- डॉ.चारुदत्त शिंदे, जिल्हा शल्यचिकीत्सक

शासकीय आरोग्य संस्थेत येणाऱ्या प्रत्येक रुग्णांवर या योजने अंतर्गत विनामूल्य आणि दर्जेदार उपचार देण्यासाठी जिल्हा रुग्णालय नाशिक मधील सर्व वैदयकीय अधिकारी आणि कर्मचारी आणि महात्मा फुले योजनेचे समन्वयक डॉ पंकज दाभाडे आणि त्यांची टीम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

- डॉ बाबासाहेब देशमुख

जिल्हा शासकीय रूग्णालयात एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना राबवण्यात येतात. जास्तीत जास्त रुग्णांनी या योजनांचा लाभ घ्यावा यासाठी जिल्हा शासकीय रूग्णालय नेहमीच प्रयत्नशील आहे. या योजनेंतर्गत रूग्णांना विनामूल्य आणि दर्जेदार उपचार मिळतात. मागील आर्थिक वर्षात केलेल्या कामकाजाचे राज्य स्तरावर मूल्यांकन करून उत्कृष्ट कामगिरी केलेल्या रुग्णालयांचा गौरव दरवर्षी करण्यात येतो.या योजनेच्या यशस्वितेसाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ चारुदत्त शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ निलेश पाटील, योजनेचे नोडल अधिकारी डॉ बाबासाहेब देशमुख, जिल्हा रुग्णालयातील सर्व विभागप्रमुख, सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नाने रुग्णांना विनामूल्य उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

न्यूज कॉलम

सिन्नरमधील वाहतूक कोंडी सुटली

धुळे । सिन्नर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खापराळे नाका व सिन्नर सरदवाडी रस्त्यावर बेशिस्त वाहतुकीवर ठोस उपाययोजना म्हणून पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी नायलॉन दोरीचा पॅटर्न राबवला आहे. सिन्नर नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला. सिन्नर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खापराळे नाका व सिन्नर सरदवाडी रस्त्यावर अतिक्रमणामुळे कायम वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर तक्रारी केल्या होत्या.

बिबट्याशी कडवी झुंज देत वाचविले मित्रांचे प्राण

नाशिक । निसर्गाची किमया मोठी अगाध आहे. नशिबाची दोरी लांब असली तर तेथे कुणाचेच काही चालत नाही. असाच प्रत्यय शुक्रवारी देशभर प्रजासत्ताक दिनाचा उत्साह असताना शाळकरी मुलांवर बिबट्याच्या झालेल्या हल्ल्याबाबत आला आहे. स्वतः वरील विश्वास व दुसऱ्याप्रती जिव्हाळ्यामुळे एका मित्राने आपल्या जिवलग तीन मित्रांना साक्षात मृत्यूच्या दाढेतून खेचून आणत 'ही दोस्ती तुटायची नाय'ची अनुभूती दिली आहे.

लोकसभा आणि विधानसभेत काँग्रेस आघाडीच सरकार स्थापन करेल : प्रभारी रमेश चेन्नीथला

काँग्रेस पक्षाची उत्तर महाराष्ट्र आढावा बैठक

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

देशात आणि जनतेमध्ये काँग्रेसची विचारधारा आहे.त्यामुळे हुकूमशाही सरकार विरोधात लढण्यासाठी काँग्रेसेच्या प्रत्येक कार्यकर्त्याने आता सज्ज व्हायचे आहे. ज्या काँग्रेसने आपल्याला सर्वकाही दिले त्याच काँग्रेस पक्षाला आता आपल्याला द्याचे आहे. त्यासाठी पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात जावून काँग्रेस पक्षाची विचारधारा पोहचवावी आणि काँग्रेसला मजबुत करायचे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केले. दरम्यान उत्तर महाराष्ट्रातील लोकसभा तसेच विधानसभेच्या सर्व जागा इंडीया आघाडी आणि महाविकास आघाडीच जिंकेल असा विश्वास उत्तर महाराष्ट्र विभाग आढावा बैठकीत व्यक्त करीत काँग्रेसच्या नेत्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या उत्तर महाराष्ट्र विभागातील जिल्हानिहाय आढावा बैठकीचे धुळ्यात दि.२७ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. बैठकिला महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला,प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात, कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्यासोबत उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेस प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेसच्या उत्तर महाराष्ट्र विभागतील प्रत्येक जिल्हयातील काँग्रेस पक्षाचा आढावा पहिल्या सत्रात घेण्यात आला. यावेळी धुळे , नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, नाशिक जिल्हयातील प्रत्येक जिल्हाध्यक्षांनी आपल्या जिल्हयातील पक्षीय माहिती दिली. जिल्हयातील तालुका काँग्रेस,महिला काँग्रेस,युवक काँग्रेस,इंटक,एन.एस.यु.आय यांच्यासह सर्व फ्रंट ऑर्गनायझेशन आणि विविध सेलच्या पदाधिकार्यांशी प्रभारी चेन्नीथला तसेच प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी चर्चा केली. यावेळी कार्यकारणी विस्तार व पदाधिकार्यांच्या तत्काळ नियुक्त्या करण्याच्याही सूचना त्यांनी दिल्या.

आढावा बैठकिच्या दुपारच्या सत्रात धुळे,नंदूरबार,जळगाव,अहमदनगर,नाशिक जिल्हयातून आलेले पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळावा या बैठकीत घेण्यात आला. यावेळी पदाधिकार्यांना उद्देशून बोलतांना प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले कि,काँग्रेस पक्षाने पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मोठे केले आहे.आता काँग्रेस पक्षाला देण्याचे दायित्व आपल्याकडे आले आहे.म्हणून काँग्रेस पक्षाची विचारधारा घराघरापर्यंत पोहचवून पक्ष मजबूत करण्याचा लढा आपला उभा करायचा आहे. काँग्रेस पक्षाची ही चळवळ शक्तीशाली करुन येणार्या निवडणूकीसाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आता सज्ज व्हायचे आहे. देशातील भाजपा हा पक्ष जाती धर्माच्या नावावर राजकारण करुन लोकांना विभाजित करीत आहे. भगवान श्रीराम आणि मंदिराच्या विरोधात आम्ही नाही. काँग्रेस पक्षातील प्रत्येक कार्यकर्ता,पदाधिकारी भाजपाच्या हुकूमशाही विरोधात लढण्यासाठी सक्षम असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. आढावा बैठकिनिमित्त झालेल्या मेळाव्याला महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला,प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात, कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील,सहप्रभारी आशिष दुवा, माजी मंत्री शिवाजीराव मोघे,कार्याध्यक्ष आ.प्रणिती शिंदे,आ.हिरामण खोसकर,आ.शिरीष चौधरी,आ.के.सी.पाडवी,आ.पदमाकर वळवी,माजी खा.बापू चौरे,माजी मंत्री चंद्रकांत हांडोरे,प्रदेश उपाध्यक्ष शरद आहेर, प्रवक्ता राजू वाघमारे,भाई नगराळे, माजी मंत्री शोभाताई बच्छाव,प्रदिप राव, राजराम पानगव्हाणे,आदी उपस्थित होते.

आर.सी. पटेल महाविद्यालयात आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धा रंगल्या

शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आर.सी.पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धा संपन्न झाल्या. भुवनेश्वर येथे झालेल्या रग्बी स्पर्धेत महाराष्ट्र संघाची कर्णधार राहिलेली आणि आपल्या खेळाचे उत्तम प्रदर्शन करून महाराष्ट्राला कांस्यपदक मिळवून देणारी भारती पावरा हीचा विशेष सत्कार करण्यात आला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अंतर्गत आंतर विभागीय रग्बी पुरुष व महिला स्पर्धेचे आयोजन शिरपूर येथील आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात क्रीडा विभागामार्फत करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.आर.पाटील, उपप्राचार्य डॉ.आर. डी.जाधव, उपप्राचार्य डॉ.ए.एम. पाटील, धुळे विभाग समितीचे सचिव नितीन वाळके, जळगाव विभागाचे सचिव डॉ. गोविंद मारतळे, एरंडोल विभागाचे सचिव डॉ. विजय पाटील उपस्थित होते. या स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विभागातील धुळे, जळगाव, एरंडोल, नंदुरबार येथील पुरुष व महिला संघ सहभागी झाले होते. यावेळी खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील यांनी मार्गदर्शन केले.रब्बी पुरुष गटात जळगाव विभागाने धुळे विभागाचा पराभव करून विजय संपादन केला तर धुळे विभाग दुसऱ्या स्थानावर राहिला. महिला गटात अंतिम सामना धुळे विरुद्ध जळगाव झाला. यामध्ये धुळे संघाने २० गुणांची आघाडी राखत एकतर्फी दणदणीत विजय मिळवला. यामध्ये आर.सी.पटेल संकुलाच्या १० विद्यार्थिनींचा सहभाग होता. स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात सिनेट सदस्य डॉ.गजानन पाटील, डॉ.ए.एम. पाटील, सर्व विभागातील सचिव, महाविद्यालयातील शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विजयी व उपयोगी संघांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

आदर्श शैक्षणिक संकुलात भक्ती वंदना कार्यक्रम संपन्न

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

अयोध्येमधील भव्य, दिव्य असे श्रीराम मंदिरातील श्रीराम मूर्ती प्राण प्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त, आदर्श शैक्षणिक संकुलामध्ये भक्ती वंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरवात कैम्ब्रिज इंटरनॅशनल स्कूलचे चिमुकले विद्यार्थी यांनी श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमान यांच्या आगमनाने झाली. या कार्यक्रमात आदर्श संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब महेंद्र विसपुते आणि सचिव स्मिताजी विसपुते उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून ह. भ. पा. पुरोहित श्री. धनंजय देशपांडे हे वक्ते होते तसेच श्री. निलेश दिक्षित, श्री. जितेंद्र कुलकर्णी होते.

या कार्यक्रमात आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सौ. कमलताई डी. विसपुते प्राथमिक विद्यामंदीर, बापूसाहेब डी. डी. विसपुते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आदर्श पॉलीटेक्नीक, बापूसाहेब डी. डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कैम्ब्रिज इंटरनॅशनल स्कूल, आदर्श मॉन्टेसरी ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, केंद्रीय अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा येथील विद्यार्थी व स्टाफ सहभागी झाले. यासाठी संस्थेचे अध्यक्ष महेंद्रजी विसपूते व सचिव स्मिताताई विसपूते यांचे मार्गदर्शन लाभले.

जात पडताळणी त्रुटींसाठी शिबिर

धुळे । जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयाकडे जात वैधता प्रमाणपत्र त्रुटी पुर्तता करण्यासाठी २९ ते ३१ जानेवारी, दरम्यान विशेष त्रुटी पुर्तता शिबिर होणार आहे, अशी माहिती जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य तथा उपायुक्त राकेश महाजन यांनी दिली आहे. नोकरी विषयक जात वैधता प्रस्ताव तसेच ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकीचे प्रस्ताव पडताळणीसाठी सादर केले.

गुरुवारपासून राज ठाकरे नाशिक दौऱ्यावर

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

गेल्या महिन्याभरापासून नाशिकचे राजकीय महत्व वाढल्याचे दिसून येत आहे. १२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी नाशिक दौऱ्यावर होते. २२ जानेवारीला अयोध्येत राम मंदिराचा लोकार्पण सोहळा पार पडला. या सोहळ्याला न जाता ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी नाशिकला हजेरी लावली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक नेतेमंडळींनी नाशिकला हजेरी लावली. त्यानंतर आता मनसे प्रमुख राज ठाकरे देखील नाशिक दौऱ्यावर येणार आहेत.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून राज ठाकरे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात नाशिकमध्ये चार दिवसांचा तळ ठोकणार आहे. लोकसभेत मतांची विभागणी करण्यासाठी राज ठाकरे रणनीती आखणार आहेत. २००८ साली नाशिकमध्ये मनसेचे तीन आमदार निवडून आले होते. तर २०१२ साली नाशिक महापालिकेत मनसेचे तब्बल ४० नगरसेवक निवडून आले. त्यानंतरच्या निवडणुकीत मात्र मनसेला नाशिकचा गड राखता आला नाही. नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी सरचिटणीस किशोर पाटील यांची निरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन निवडणुकीच्या तयारीचा आढावा राज ठाकरेंकडे सादर केला आहे. नाशिकमध्ये लोकसभा, विधानसभा व महापालिका निवडणुकांची रणनीती आखण्यात येईल. लोकसभा निवडणुकीत मनसेकडून उमेदवार उभा केला जाणार असून नाशिकमधून दिलीप दातीर यांच्या यांच्या नावाची चर्चा आहे.

जिल्हा बालरोग तज्ञ संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ.तुषार कानडे,सचिवपदी डॉ.दादाभाई पाटील

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे जिल्हा बालरोग तज्ञ संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ.तुषार कानडे यांची तर सचिव म्हणून डॉ.दादाभाई पाटील यांची निवड करण्यात आली. जिल्हा संघटनेचे खजिनदार म्हणून डॉ.अविनाश सैंदाणे यांची नियुक्ती झाली आहे.

धुळे जिल्हा बालरोग तज्ञ संघटनेच्या पदाधिकार्यांची बैठक नुकतीच धुळ्यात पार पडली. बैठकित नवीन जिल्हा कार्यकारीणी जाहिर करण्यात आली. जिल्हा बालरोग

संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ.तुषार कानडे,सचिव म्हणून डॉ.दादाभाई पाटील यांची निवड करण्यात आली. जिल्हा संघटनेचे खजिनदार म्हणून डॉ.अविनाश सैंदाणे, कार्यकारी अध्यक्ष डॉ.सुनिल पगारे,उपाध्यक्ष डॉ.परिक्षित देवरे, कल्चरल सेक्रेटरी डॉ.महेश अहिरराव,डॉ.सचिन ढोले,डॉ.अभिनय दरवडे यांची निवड झाली आहे. तर जिल्हा कार्यकारीणीत डॉ.काबरे, डॉ.अरुणा जोशी, डॉ.जगदिश पाखरे, डॉ. संजय जोशी, डॉ.अभय कुलकर्णी, डॉ. सुरेश वसईकर,डॉ.जयंत देवरे, डॉ.पुरुषोत्तम राठी, डॉ.राजेश अग्रवाल, यांचा समावेश आहे. शिरपुर तालुका सचिवपदी डॉ.सचिन पाटील,सहसचिवपदी डॉ.विरेंद्र देसले, शिंदखेडा तालुका सचिवपदी डॉ.चेतन बच्छाव दोंडाईचा, सहसचिवपदी डॉ.हितेंद्र पवार, साक्री तालुका सचिवपदी डॉ.गिरीश जैन,सहसचिवपदी डॉ.कपिल देवांग यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बैठकित डॉ. संजय जोशी यांना लाईफ टाईम अचिवमेंट पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. संघटनेचे कामकाज उत्तमरित्या सांभाळल्याबद्दल मागील कार्यकारीणीचा सत्कार करण्यात आला. दरम्यान येणार्या काळात संघटनेच्या माध्यमातून वैद्यकीय तसेच सामाजिक क्षेत्रात विविध समाज उपयोगी उपक्रम राबविणार असल्याचे नुतन अध्यक्ष डॉ.तुषार कानडे यांनी यावेळी सांगितले.

नाशिकमध्ये थंडीची लाट, तापमान ८.६ अंशावर

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहरात संपूर्ण हंगामात कडाक्याच्या थंडीपासून दुरावलेल्या नाशिककरांना अखेरच्या टप्प्यात तिची सुखद अनुभूती मिळत असून गुरुवारी हंगामातील ८.६ अंश सेल्सिअस नीचांकी तापमानाची नोंद झाली. हंगामात प्रथमच तापमान इतके खाली घसरल्याने नाशिककरांना हुडहुडी भरली आहे. दोन दिवसांपासून तापमानात घट होत असून नाशिकमध्ये थंडीची लाट आल्याची स्थिती आहे. यंदाच्या हंगामात कडाक्याची थंडी नाशिकमधून अंतर्धान पावल्याची स्थिती होती. एरवी डिसेंबर, जानेवारीत हुडहुडी भरवणारी थंडी अनुभवयास मिळते.

नाशिकमध्ये जुगार अड्डा उद्धवस्त, २९ लाखांचा मुद्देमाल जप्त

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मखमलाबाद येथील काकड मळ्यातील जुगार अड्डा शहर गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने उद्धवस्त केला आहे. पोलिसांनी ११ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले असून मोबाईलसह चारचाकी कार असा २९ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मखमलाबाद गावातील काकड मळा येथे सुरेश मुरलीधर काकड हा तिरट नावाचा जुगार खेळवित असल्याची माहिती शहर गुन्हेशाखेच्या विशेष शाखेचे उपनिरीक्षक दिलीप सगळे, हवालदार किशोर रोकडे यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे विशेष पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज भालेराव यांना काकड मळ्यातील सुरेश काकड त्याच्या घराचे पाठीमागे वॉल कंपाऊंड जवळ मोकळ्या जागेत जुना चांदशी रोड या ठिकाणी पत्याचा जुगार अड्डा सुरू असल्याचे दिसले. त्यानंतर विशेष शाखेने या जागेवर छापा टाकला. सुरेश मुरलीधर काकड (५१, रा. मानसी महल, संभाजी चौक, मेनरोड, मखमलाबाद नाशिक), स्वप्नील रमेश मानकर (३०, रा. मानकर मळा, मखमलाबाद रोड), अनिल जगन्नाथ मानकर (५३, रा. राम मंदिराचे समोर, मखमलाबाद), दत्तु किसन सुर्यवंशी (४३, रा. एरिगेशन कॉलनी, मखमलाबाद), भगवान मोतीराम काकड (४०, रा. मखमलाबाद, नाशिक), रविकांत गणपत गामणे (४०, रा. कुंभार गल्ली, मखमलाबाद), अक्षय सुनिल काकड , रा. मखमलाबाद), विशाल ज्ञानेश्वर काकड , सुनिल रघुनाथ काकड (५०, रा. काकड मळा, मखमलाबाद) यांना जुगार अड्ड्यावरून ताब्यात घेतले.

धुळे एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ मुंबई संचलित धुळे येथे एस.व्ही. के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्राचार्या सुनंदा मेनन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत, ध्वजगीत गाऊन ध्वज मानवंदना देण्यात आली. इयत्ता चौथी आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांनी मार्च पास्ट सादर करत भारतीय ध्वजाला अभिवादन केले. यातून शिस्त आणि

एकतेचे उल्लेखनीय प्रदर्शन पहायला मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील झेनब मेमोन व इयत्ता सातवीतील राजवर्धन मुंदडा यांनी केले.

प्राचार्या सुनंदा मेनन यांनी प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देत समता व प्रगती या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. इयत्ता पाचवीतील अनुष्का गावंडेने हिंदी तर इंग्रजीतून भाषण इयत्ता सहावीतील पौर्णिमा पाटीलने केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावरदेखील संगीत व नृत्य सादर केले. राष्ट्राप्रती एकता आणि जबाबदारीचे महत्त्व पटवून देण्यात आले. या उत्सवामुळे शालेय समुदायामध्ये देशभक्ती आणि अभिमानाची भावना निर्माण झाली. आभार इयत्ता सातवीतील कोमल कदम हिने मानले. चित्र रेखाटन व लेखन कार्य कलाशिक्षक संजय गलवाडे व वृषाली मांडरे यांनी केले. प्राचार्या सुनंदा मेनन यांच्या मार्गदर्शनाखाली तरणजीत कौर, विभा भट्टड, मुनमुन दत्ता, माधव साळवे, भाग्यश्री देशमुख, विरेंद्र सैदाणे, संकेत रुद्र, दिपेंद्र गिरी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

नागरी सहकारी बँकांनी आधुनिकतेची कास धरावी : मा अनिल कवडे

सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र

नाशिक । दिलीप साळुंके

नागरी सहकारी बँकांनी सहकार व्यवस्था बळकट करण्यासाठी मोलाची भूमिका बजावली असून या पुढच्या स्पर्धेच्या काळात सहकारी बँकांनी व्यावसायिकतेकडे झेप घेणे गरजेचे आहे त्यासाठी व्यवस्थापनात अचूकता,सुलभता ,पारदर्शकता यांची सांगड घालावी व समाजातील शेवटच्या माणसापर्यंत बँकिंग सुविधा पोहोचवावी . संचालक ,कर्मचारी ,यांना प्रशिक्षित करून बँकेच्या हितासाठी उपयोग करावा ती काळाची गरज आहे .त्याचबरोबर डिजीटलायझेशन,आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे इंटरनेट बँकिंग,मोबाईल बँकिंग चा स्वीकार करून सहकाराला आधुनिकतेचे रूप द्यावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त तथा निबंधक अनिल कवडे यांनी केले.

नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन नाशिक आयोजित दादासाहेब गायकवाड सभागृह, नाशिक येथे दोन दिवसीय महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक परिषद २०२३-२४ चा आज समारोप झाला त्याप्रसंगी श्री कवडे बोलत होते.

प्रत्येक संचालकाने कोणताही निर्णय घेण्या अगोदर आपण योग्य करतो आहोत का? याचा बारकाइने विचार केला पाहीजे, कारण, हा निर्णय हजारो ठेवीदारांच्या हिताशी निगडीत असतो. आम्ही कुठे चुकतो व काय केले पाहिजे, याचा अभ्यास केल्याशिवाय पुढे जाता येणे अवघड असल्याकडे यावेळी त्यांनी लक्ष वेधले.

सहकार क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांवर सहकार परिषदेत चर्चा झाली,विचारमंथन झाले,तसेच आधुनिक बँकिंगचा विचार सर्वदूर पोहोचत आहे हे प्रगतीचे लक्षण आहे ते या परिषदेच्या निमित्ताने यशस्वी झाल्याची भावना परिषदेचे अध्यक्ष व निमंत्रक विश्वास ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केली. परिषदेत नागरि सहकारी बँकांकडून ज्या अपेक्षा सरकारच्यावतीने व्यक्त झाल्या त्यातील जितक्या पुर्ण करणे शक्य आहे, त्या नक्कीच करू अशी ग्वाही ठाकूर यांनी व्यक्त करतांना दिली. यावेळी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण तथा आदिवासी विभाग राज्यमंत्री व सहकार परिषदेच्या स्वागताध्यक्षा डॉ. भारती पवार, आ सीमा हिरे अजय ब्रह्मेचा, डॉ शशी ताई अहिरे उपस्थित होते.सहकार भारती च्या वतीने विवेक जुगादे यांनी विश्वास ठाकूर यांचा सहकार परिषद उत्कृष्ठ आयोजन बद्दल सत्कार केला सूत्रसंचालन डॉ स्मिता मालपुरे यांनी केले.

नाशिकमध्ये भरदिवसा घरफोड्या, पावणे तीन लाखांचा मुद्देमाल लंपास

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहरात दिवसेंदिवस घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. घरफोडी रोखणे नाशिक पोलिसांपुढे मोठे आव्हान असून पुन्हा एकदा शहरात तीन घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. यात चोरांनी सुमारे पावणे तीन लाखांचा मुद्देमाल लंपास केला आहे. यात दोन घरफोड्या भरदिवसा झालेल्या आहेत. सातपूर औद्योगिक वसाहतीतील केवल पार्क मार्ग, रविवार कारंजा आणि सातपूर परिसरात या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी सरकारवाडा, सातपूर आणि देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली घटना सातपूर औद्योगिक वसाहतीतील केवल पार्क मार्गावर घडली आहे. याबाबत ओमकार कुलकर्णी यांचे कुटुंबीय काही कामानिमित्त घराबाहेर पडले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडून कपाटातील सुमारे ९५ हजाराचे अलंकार चोरून नेले आहेत. याबाबत ओमकार विनायकराव कुलकर्णी (रा.जाधव पार्क,सातपूर) यांनी तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार बेंडकुळे करीत आहेत.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
सोमवार दि. २९ जानेवारी २०२४

धुळ्यात रंगली एकपात्री अभिनय स्पर्धा

धुळ्यातील नाट्य कलावंतांचे उत्तम सादरीकरण : परिक्षक श्रीनिवास नार्वेकर



धुळे । अखिल
भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने जानेवारी ते मे २०२४ महाराष्ट्रभर नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्याअंतर्गत महोत्सव १५ जानेवारीपासून सुरू झाला आहे. यात धुळ्यात दि २८ रोजी एकपात्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नाट्य परिषदेच्या धुळे जिल्हा शाखेतर्फे देखील विविध स्पर्धा सुरु असून रविवार दि. २८ जानेवारी रोजी पत्रकार भवन, साक्री रोड येथे एकपात्री स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कलावंत देखील सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उदघाटन धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मिलिंद बैसाणे व धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे यांच्या हस्ते करण्यात आले. तर व्यासपीठावर मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, परीक्षक परिक्षक श्रीनिवास नार्वेकर, परिक्षक प्रदीप राणे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिन बागुल, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे कार्यकारणी सदस्य प्रा. मोहन मोरे आदी उपस्थित होते.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

एकपात्री अभिनय स्पर्धेस धुळ्यात प्रतिसाद

धुळे शाखेतर्फे परिक्षकांना सन्मानचिन्ह देऊन गौरव









धुळे

। कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद बैसाणे यांनी कलाकाराने छोट्या मोठ्या कला आत्मसात केल्या पाहिजेत.त्या सादर देखील केल्या पाहिजेत. असे सांगत कलाकारांना मार्गदर्शन केले.यावेळी मनोज गर्दे यांनी देखील कलाकारांचे कौतुक करत मार्गदर्शन केले. कलाकारांना मार्गदर्शन करतांना चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले कि, सर्व स्पर्धकांनी चांगला अभिनय केला. परंतु नाटकांची माहिती घेत. नवनवीन देखील शिकत राहावे. शेवटच्या पायरी पर्यंत यश कसे प्राप्त करता येईल यासाठी परिश्रम देखील घेतले पाहिजे असे देखील कलाकरांना मार्गदर्शन करताना सांगितले. या स्पर्धेतील सहभागी कलाकारांना प्रशस्तीपत्र देखील देण्यात आले. तर या स्पर्धेचा निकाल आज जाहीर करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील एका विजेत्यास विभागीय स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. त्यानंतर उपांत्य अंतिम फेरी होईल. अशा तीन फेर्यांमध्ये ही स्पर्धा होईल. त्यानंतर मुंबई येथे अंतिम फेरीचे आयोजन केले आहे. अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी चार दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन केले असून, व्यावसायिक कलावंतांसह महाराष्ट्रातील हौशी कलावंतांना नाट्यसंमेलनात कला सादर करण्याची संधी या नाट्यकलेचा जागरमधून मिळणार आहे.